# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/ 1784

दिनांक :- 26 JUN 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त / उपलब्ध जागांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संकलक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/DSD Vacancy/२०२५/२६९ दिनांक २५/६/२०२५.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून सदर प्रवेश प्रक्रियेकरीता उपलब्ध जागेची माहीती आपल्या लॉगिनमधुन दिनांक ५/७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अपडेट करुन निश्चीत करावी. तसेच सदर माहीती या कार्यालयाचे लॉगिनमधुन निश्चीत करण्यासाठी दिनांक ७/७/२०२५ रोजी आवश्यक कागदपत्रासह (जसे शाखाबदल, संस्थाबदल, विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केलेले असल्यास विद्यार्थ्यांना वाटप केलेले संस्था सोडल्याचा दाखल्याची प्रत तसेच विद्यार्थ्याने प्रवेश रद्द करण्यासाठी केलेला अर्ज, तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील गुणवत्ता यादीची प्रत व प्रथम वर्ष निकालाचे गॅझेट ) या कार्यालयात उपस्थित राहावे. वर नमुद केल्याप्रमाणे सदर दिनांकापर्यंत कार्यवाही न केल्यास या कार्यालयाव्दारे आपल्या थेट व्दितीय वर्षाची माहीती अपडेट केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत भविष्यात अडचण निर्माण झाल्यास आपण स्वतः जबाबदार राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**सहपत्र :-** संदर्भीय पत्र.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळार प्रदर्शित करण्यासाठी तसेच सदर माहितीची संवेदनशीलता लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक करण्याची दक्षता घेण्याची यावी.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एडीएम/DSD Vacancy/२०२५/२६८ दिनांक : 25 JUN 2025

प्रति,
प्राचार्य,
थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त / उपलब्ध जागांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत

संदर्भ:- संचालनालयाची ॲडमिशन नोटिस क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२५/थेट द्वितीय वर्ष पदविका/२५२, दिनांक : १९/०६/२०२५

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांच्या थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीचे संपुर्ण वेळापत्रक संदर्भीय परिपत्रकाद्वारे घोषित केले आहे. सदर पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रमनिहाय रिक्त / उपलब्ध जागांची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रमनिहाय मागील वर्षांत प्रथम वर्षासाठी मंजुर करण्यात आलेले प्रवेश, प्रथम वर्षांतील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे निकाल, संस्था सोडुन गेलेले विद्यार्थी, अभ्यासक्रम बदल, संस्था स्थलांतर इ. बाबीची माहिती थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात यावी. तदनंतर प्रणालीद्वारे नियमानुसार ऑनलाईन पद्धतीने रिक्त माहिती परिगणना करण्यात येईल. प्रणालीद्वारे परिगणना करण्यात आलेल्या रिक्त जागांची संख्या प्राचार्यांनी पडताळुन निश्चित करण्यात यावी. तसेच ज्या संस्थांना थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) उमेदवारांच्या स्वतंत्र तुकडीसाठी मान्यता मिळालेली आहे अशा अभ्यासक्रमांसाठी संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती Intake Approval System या प्रणालीवर अद्ययावत करण्यात यावी. या दोन्हीबाबतची कार्यवाही संस्थांनी दि.०८ जुलै २०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत करावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संबधित पदविका

संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी क[illegible] अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि.०८ जुलै २०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

२) का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

*******